| | | |
|---|---|---|
| | Pimpri Chinchwad Education Trust's<br>Pimpri Chinchwad College of Engineering<br>Sector No.26, Pradhikaran, Nigdi, Pune 411 044<br>Tel.:020-27653168/27653166 Website :www.pccoepune.com | Record No.: ADMN-STUD-R-07-SCH<br>Rev.00 Date: 18/08/2023<br>Page:01 |

## सुचना ः कास्टच्या विद्यार्थ्यांना (VJNT, SBC & OBC) प्रथम ते अंतिम वर्ष सर्वांसाठी.

Ref. No. : PCCoE/Caste Scholrship Notice/2024-25/ 929 Date : 01/01/2025

**आतापर्यंत ज्या VJNT, SBC & OBC विद्यार्थ्यांनी उत्पन्न रू.८.00 लाखाच्या पुढे असता त्यांना VJNT, SBC & OBC शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क फॉर्म भरता येत नव्हते, अशा सर्व विद्यार्थ्यांना शासन परिपत्रक कमांक शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१ दिनांक १५/१०/२०२४, नुसार शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्कचे अर्ज (फॉर्म) भरता येणार असून त्यांनी अंतिम दिनांक १५/0१/२०२५ पर्यंत कागदपत्रांसह अर्ज शिष्यवृत्ती विभागात अंतिम दिनांकाची वाट न पहाता लवकरात लवकर जमा करावेत.**

मग विद्यार्थ्याचा प्रवेश जुना (म्हणजेच शै.वर्ष २0२३-२४ पूर्वीचा किंवा त्या अगोदरचा असेल तरीदेखील चालेल) त्यांना अर्ज भरता येणार आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश हे (**CAP round** मधून) **VJNT, SBC & OBC** या प्रवर्गातीलच असावेत.

सोबत **शासन परिपत्रक क्रमांक ः शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१ दिनांक १५/१०/२०२४ जोडत आहोत.**

VJNT, SBC & OBC Tuition Fees & Examination Fees च्या विदयार्थ्यांसाठी उत्पन्नाची मर्यादा नाही (**प्रथम प्रवेशित वर्षासाठीचा जो उत्पन्न दाखला होता तोच अपलोड करायचा आहे**). तरी **VJNT, SBC & OBC** विद्यार्थ्यांनी वरील शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्कचे अर्ज **https://mahadbt.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर भरावेत. अर्ज भरून तपासून घ्यावेत आणि त्यानंतर खालीलप्रमाणे कागदपत्रानिशी जमा करावेत. **अर्जासोबत अपलोड व जमा करायची कागदपत्रे खालीलप्रमाणे ः**

१. उपस्थिती प्रमाणपत्र, **हे प्रमाणपत्र कॉलेज झेरॉक्स सेंटरमध्ये उपलब्ध आहे.**

२. महाविदयालयात प्रवेश घेतल्याचे प्रवेश प्रमाणपत्र Confirmation Letter.

३. चालू शैक्षणिक वर्षास प्रवेश घेतल्याची फी पावती (Admission Fee receipt)

४. तहसिलदार प्रमाणीत **उत्पन्नाचे मुळ** प्रमाणपत्र प्रवेशित वर्षाचे (**दोन्ही पालकांचे एकत्रित**) उत्पन्नाचा दाखला असावा, वडील हयात नसतील तर (***आईचा उत्पन्नाचा दाखला*** जोडावा व वडीलांचे मृत्यूचे प्रमाणपत्र)

५. जात प्रमाणपत्र (Cast Certificate), ६. जात वैधता प्रमाणपत्र (Cast Validity)

**७. नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ः हे नव्याने समाविष्ट केलेले आहे हे जमा करणे बंधनकारक आहे.**

८. मागील वर्षाची गुणपत्रिका एस एस सी, एच एस सी किंवा डिप्लोमा झाल्यास त्याची तसेच FE, SE, TE, गुणपत्रिका.

९. एच एस सी किंवा डिप्लोमा पूर्ण झाल्याचा दाखला (Leaving Certificate/Transfer Certificate).

१0. राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र, ११. प्रतिज्ञापत्र ः विद्यार्थी व पालक यांचे (Declaration) **हे प्रमाणपत्र कॉलेज झेरॉक्स सेंटरमध्ये उपलब्ध आहे,** १२. बॅंक पासबुक, १३. आधार कार्ड सिडेड फॉर्म, १४. आधार कार्ड.

**या व्यतिरिक्त शिष्यवृत्तीच्या वेबसाईटवर जी माहिती नवीन समाविष्ट असेल त्याप्रमाणे.** (तसेच ज्या विदयार्थ्यांनी पोस्ट ऑफिस मध्ये अकाउंट ओपन केले आहे ते अकाउंट सुद्धा ग्राहय धरले जाईल).

विशेष बाब ः **१. शासनाच्या धोरणानुसार विद्यार्थी एकाच शासकिय योजनेचा / सवलतीचा लाभ घेऊ शकतो.**
**२. तसेच ज्या विद्यार्थ्याला फॉर्म भरायचा नाही त्यांनी खुल्या प्रवर्गाप्रमाणे महाविद्यालयाचे शुल्क भरावे.**

Dr. Govind N. Kulkarni
Director

Pimpri Chinchwad College of Engineering — An Autonomous Institute — Nigdi, Pune-44

CC to :
: 1. H.O.D., Mech/E&Tc/Comp/I.T./Civil/AIML/RL/M.C.A./FY/SY/TY/B.Tech request to circulate in all classes & Display on notice board.
2. Boys and Girls Hostel, 3. Prof. Ketan Desale - please upload on college website, 4. Office copy.

Acknowledge to notice No. PCCOE/Caste/N/2024-25/929 Date : 01/01/2025 Notice read out in the class.

| Sr. | Date | Class & Division | Name of Teacher & Student in Full | Signature |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |
| 6 | | | | |
| 7 | | | | |
| 8 | | | | |
| 9 | | | | |
| 10 | | | | |
| 11 | | | | |
| 12 | | | | |
| 13 | | | | |
| 14 | | | | |
| 15 | | | | |
| 16 | | | | |
| 17 | | | | |
| 18 | | | | |
| 19 | | | | |
| 20 | | | | |
| 21 | | | | |
| 22 | | | | |
| 23 | | | | |
| 24 | | | | |
| 25 | | | | |

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरिता नॉन -क्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत....

महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग,

**शासन परिपत्रक क्रमांक : शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१**

मोती महल, २ रा मजला, १९५,जे. टाटा रोड, चर्चगेट,मुंबई-४०००२०

दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२४.

**संदर्भ-** १) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२/ विजाभज-१, दि.२५ मार्च, २०१३

२) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक सीबीसी-२००८/ प्र.क्र.६९७/ विजाभज-१, दिनांक १६ डिसेंबर, २०१७

३) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक इबीसी-२०१७/ प्र.क्र.२७/ शिक्षण, दिनांक ०१ जानेवारी, २०१८

४) शासन शुध्दीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, समक्रमांक दि.२०.०९.२०२४

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भ क्र.४ येथे नमूद दि.२०.०९.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वयें राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरिता उत्पन्नाची अट रद्द करण्यात आली असून त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. सदर शुद्धीपत्रकाच्या अनुषंगाने सविस्तर सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सविस्तर सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**परिपत्रक :-**

१) संदर्भ क्र.३ येथे नमूद दि.०१ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.८.०० लक्ष इतकी करण्यात आली होती. संदर्भ क्र. ४ येथे नमूद दि.२०.०९.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये उत्पन्नाची अट रद्द करण्यात आली असून आता त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

२) संदर्भ क्र. ४ येथे नमूद दि.२०.०९.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याबाबत केलेली सुधारणा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी लागू करण्यात आली आहे.

३) सदर आदेश शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू करण्यात येत आहेत.

४) सदर आदेश यापूर्वी प्रवेशित विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू करण्यात येत असून सदर विद्यार्थ्यांना हे आदेश लागू होण्याच्या पूर्वीच्या कालावधीसाठी परीक्षा शुल्क व शिक्षण शुल्क प्रतिपर्ती अनुज्ञेय होणार नाही.

५) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती या योजनेकरिता महाडिबीटी प्रणालीवरील संलग्न (मॅपिंग) असलेल्या अभ्यासक्रमांसाठी सदर सुधारणा लागू राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२४१०१५१५०९२९९२३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAKASH SHRIDHAR DHAWLE

( डॉ.प्रकाश धावले )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
९) संचालक लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
१०) जिल्हाधिकारी (सर्व)
११) प्रादेशिक उपसंचालक/प्रादेशिक उपायुक्त (सर्व)
१२) सहायक आयुक्त/सहाय्यक संचालक (सर्व)
१३) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
१६) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
१७) विभागातील सर्वसह सचिव / उप सचिव / अवर सचिव, मंत्रालय, मुंबई
१८) निवडनस्ती- शिक्षण-१.